आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र दुपारी  ३.०० वाजता

२३  मार्च २०२४ - शनिवार

केंद्र सरकारने कांद्यावरची लावलेली निर्यात बंदी पुन्हा अनिश्चित काळासाठी वाढवली आहे. याबाबतची अधिसूचना काल जारी करण्यात आली. याआधी कांदा निर्यात बंदी ३१ मार्च पर्यंत लागू करण्यात आली होती.

**<><><><><><>**

समुद्रात होत असलेल्या चाचेगिरीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तैनात केलेली आय एन एस कोलकाता ही युद्धनौका ताब्यात घेतलेल्या ३५ सोमाली चाच्यांना घेऊन आज मुंबईत दाखल झाली. या चाच्यांना यलो गेट पोलिसांच्या हवाली करण्यात आलं आहे. एडनच्या आखातात ही युद्धनौका तैनात केली होती. नौकेवर सागरी चाच्यांच्या संशयास्पद हालचालींवर ड्रोनच्या सहाय्यानं ताबा मिळवल्यावर भारतीय नौदलानं आय एन एस कोलकाताच्या माध्यमातून या चाच्यांना ताब्यात घेतलं होतं.

**<><><><><><>**

कुख्यात फरार गुंड विठ्ठल पुजारी उर्फ प्रसाद पुजारी याचं आज चीनमधून भारतात प्रत्यार्पण झालं. मुंबई पोलीसांच्या गुन्हे शाखेनं त्याला आज मुंबईत आणलं. पुजारी विरोधात खुन, खनाचा प्रयत्न, खंडणी, फौजदारी कट रचणे, शस्त्रास्त्र बाळगणे अशा प्रकारचे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. मात्र तो देशाबाहेर फरार झाला होता. त्याचा माग घेत असताना, भारतीय गुप्तचर यंत्रणेनं दिलेल्या माहितीआधारे, चीनच्या सुरक्षा यंत्रणेनं त्याला फेब्रुवारी २०२३ मध्ये हाँगकाँग इथं खोटा पासपोर्ट बाळगल्याप्रकरणी अटक केली होती. यानंतर भारतानं त्याला आपल्या ताब्यात देण्यासाठी सातत्यानं केलेल्या प्रयत्नांनतर त्याचं भारतात प्रत्यार्पण केलं गेलं.

**<><><><><><>**

अमरावती लोकसभेची जागा भाजपाचा उमेदवार लढवणार असून लवकरच त्या नावाची घोषणा केली जाईल असं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी

नागपुरात माध्यम प्रतिनिधींशी बोलताना सांगितलं. रामटेक मध्ये शिवसेना शिंदे गटाचा उमेदवार निवडणूक लढवेल तर उर्वरित जागांवरचा जागावाटपाचा प्रश्न लवकरच सुटेल असं ते म्हणाले. महायुतीला निम्याहून जास्त मतं मिळतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सहभागी होणार आहेत. यानंतर शिरुर लोकसभा मतदारसंघातून अजित पवार यांच्या पक्षाकडून उमेदवारी मिळेल, असा विश्वास त्यांनी आज मुंबईत अजित पवार यांची भेट घेतल्यानंतर व्यक्त केला. याविषयावर एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाल्याचं ते म्हणाले. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणूक शरद पवार यांच्या पक्षासोबत असलेले खासदार अमोल कोल्हे यांनी त्यांना ५८ हजार मतांनी पराभूत केलं होतं.

<><><><><>

या लोकसभा निवडणुकीत भाजपा लक्षद्वीपमध्ये अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा देणार असल्याचं भाजपानं स्पष्ट केलं आहे. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी ही माहिती दिली. राष्ट्रीय लोकशाही आघाडी एकजुटीने लढत या लोकसभा निवडणुकीत यश मिळवेल, असं तावडे यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

संसदेत प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतल्याच्या आरोपावरून सी बी आय अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेनं तृणमूल काँग्रेसचे नेते महुवा मोईत्रा यांच्या कोलकात्यासह इतर काही ठिकाणांवर आज छापे मारले. सी बी आय नं

लोकपालांच्या निर्देशानुसार मोईत्रा यांच्याविरोधात प्रथम माहिती अहवाल दाखल केला आहे. याबाबतचा सविस्तर अहवाल सहा महिन्यांत सादर करण्याचे निर्देश सी बी आय ला दिले आहेत. संसदेत प्रश्न विचारण्यासाठी एका व्यापाऱ्याकडून लाच घेतल्याचा आरोप असलेल्या मोईत्रा यांना संसदेच्या नितीशास्त्र समितीच्या शिफारशीवरून डिसेंबर महिन्यात लोकसभेतून बडतर्फ करण्यात आलं होतं.

<><><><><>

राज्य सरकारनं काल इक्बाल सिंग चहल यांची मुख्यमंत्र्यांच्या सचिवालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून नियुक्ती केली आहे. भारतीय निवडणूक आयोगानं राज्य सरकारला भूषण गगराणी यांची मुंबई महानगरपालिकेचे नवीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्याचे निर्देश दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. लोकसभा निवडणुकीच्या वेळापत्रकाच्या घोषणेनंतर भारतीय निवडणूक आयोगानं ३ वर्षांपेक्षा जास्त काळ सेवा करणाऱ्या नागरी आयुक्त आणि अतिरिक्त किंवा महापालिका आयुक्तांची बदली करण्याचे आदेश दिले होते.

<><><><><>

बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला १ हजार कोटी रुपयांचा निधी हस्तांतरीत केला. हा निधी प्रामुख्यानं मेट्रो रेल्वे मार्ग बांधण्यासाठी खर्च केला जाणार आहे. हा निधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अपेक्षित असलेल्या ५ हजार कोटी रुपयांचा भाग असल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><>

आदिवासी विकास विभागांतर्गतच्या शासकीय आश्रमशाळा अतिदुर्गम भागात असल्यानं, तिथे दररोज दुध पुरवठा करणं शक्य होत नाही, त्यामुळे या शाळांना

विभागाच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या सुगंधी दुधाचा टेट्रापॅक द्वारे पुरवठा करण्याचा निर्णय घेतला असल्याचं विभागानं स्पष्ट केलं आहे. यासाठी निविदा प्रक्रिया राबवून उत्पादक निश्चित केला असल्याचं विभागाच्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

उद्या होत असलेल्या होलिका दहन आणि सोमवारी साजऱ्या होत असलेल्या रंगपंचमी निमित्त राज्यातल्या बाजारपेठा सजल्या आहेत. होळीसाठी आलेले रंग, पिचकाऱ्या यांची दुकानं सर्वत्र दिसत आहेत. त्यात रासायनिक रंगांपेक्षा नैसर्गिक रंगांना मागणी असल्याचं दिसून येत आहे. राज्यासह देशाच्या विविध भागात धुळवड मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते.परभणीच्या वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनीही मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक रंग तयार करून त्याची विक्री केली.

**<><><><><>**

देशभरात आज शहीद दिवस पाळला जात आहे.1931 साली आजच्या दिवशीच भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या तीन स्वातंत्र्यसेनानींना फाशी देण्यात आली. यानिमित्तानं राज्यपाल रमेश बैस यांनी राजभवन इथं त्यांच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. तसंच बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयातल्या महापौर दालनात देखील प्रभारी सहाय्यक आयुक्त जयदीप मोरे यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**//<><><><><>//**